Rotary District 3132

Rotary Club of Ahmednagar Central

THE MAGIC OF ROTARY

# ROTARY CLUB OF AHMEDNAGAR CENTRAL


# 2024 – 25

Bulletin - 04 | Dt. 31 / 08 / 2024

# E – CENTRAL POST

# Message From

# FOUNDER OF CLUB



**डॉ. एस्.व्ही.जोशी.**

संस्थापक अध्यक्ष.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये, माणसाचे आयुष्य साधारणपणे १०० वर्षाचे गृहित धरलेले आहे. त्यातील सुरवातीची ब्रह्मचर्याची २५ वर्षे शिकत असतो. नंतरच्या गृहस्थाश्रमाच्या २५ वर्षात, व्यवसाय करून अर्थार्जन करतो आणि पत्नी मुलांसह संसार करतो. नंतरच्या वानप्रस्थाश्रमाच्या २५ वर्षात जमवलेल्या संपत्तिचा , दानधर्म करून परोपकारासाठी विनियोग करणे अपेक्षित असते. शेवटच्या २५ वर्षात सर्वसंग परित्याग करून अरण्यात जावे आणि चिंतन मनन करून परमेश्र्वर चरणी लीन व्हावे अशी अपेक्षा असते. रोटरी क्लब सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकाळाचेही असेच ४ भाग करता येतील.

सुरवातीच्या २५ वर्षात क्लबचे सभासद रोटरीच्या कामाचा अनुभव घेत असतात. रोटरीची नवीन माहिती घेऊन ,सभासद संख्या वाढवत असतात. चांगली समाजोपयोगी कामे करून समाजात आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न करीत असतात. दुसऱ्या कालखंडात त्या क्लबने आणखी क्लब प्रायोजित करून, आपले कार्यक्षेत्र वाढवावे अशी अपेक्षा असते.

या कालावधीत क्लब आर्थिक दृष्ट्या मजबूत झालेला असतो . मोठ्या प्रमाणातले सामाजिक प्रकल्प स्वतःच्या हिंमतीवर पार पाडू शकतो. यामुळे क्लबची जनमानसातली प्रतिमा उजळून निघते. याचमुळे क्लबची सभासद संख्याही लक्षणीय रित्या वाढते. एव्हढेच नाही तर समाजातील प्रतिष्ठित व्यक्ति, क्लबचे सभासद होतात. क्लबचा रोटरी फौंडेशनमधील सहभागही वाढतो. क्लबचे सभासद क्लब व्यतिरिक्त, डिस्ट्रिक्टमध्ये महत्वाची पदे भूषवितात. २-४ सभासद प्रांतपालाचे पदही भूषवितात. तिसऱ्या कालखंडात हा मजबूत झालेला क्लब ईतर क्लबला किंवा डिस्ट्रिक्टला मदत करू शकतो. क्लबमध्ये अनेक मेजर डोनर होऊ शकतात. क्लबची ख्याती रोटरी जगतातच नाही तर सामान्य जनतेतही होते. क्लबचे काही सभासद रोटरी इंटरनॅशनलच्या व्यवस्थापनातही, महत्वाची पदे भूषवू शकतात. क्लबमध्ये अनेक सभासद मेजर डोनर आणि त्यापेक्षाही वरच्या दर्जाच्या देणग्या देतात. या क्ललबच्या सभासदांवर रोटरीची घटना आणि नियम यात सुधारणा किंवा बदल करण्याचे अधिकार व जबाबदारीही मिळू शकते.

मित्रांनो, सध्या आपला क्लब दुसऱ्या फेजमधून जात आहे.मागील ४-५ वर्षात चांगली आणि दीर्घकाल ठसा उमटविणारी समाजोपयोगी कामे केली. तरुण, उत्साही, उच्चशिक्षित सभासद नवीन आले. क्लबने ३-४ नवीन क्लब आणि बरेच रोटरॅक्ट व इंटरॅक्ट क्लब चालू केले. रोटरी फौंडेशनला घसघशीत देणग्या क्लबने दिल्या. ग्लोबल ग्रँटच्या मदतीने मोठा दीर्घकालीन प्रकल्प उभा केला. एक CSR ची मदत डिस्ट्रिक्टमध्ये प्रथमच आपल्या क्लबला मिळाली.
एकंदरीत, डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये क्लबचा चांगला दबदबा निर्माण झाला आहे.

**येत्या ३ वर्षात क्लबने खालील लक्ष्य समोर ठेवून त्यादृष्टीने पाऊले उचलावीत असे मला वाटते.**

१) सभासदसंख्या १०० पर्यंत वाढविणे.

२) आणखी ३ क्लब प्रायोजित करणे.

३) प्रत्येक वर्षी ग्लोबल ग्रँटचा किमान १ प्रकल्प करणे

४) दरवर्षी ३ पॉल हॅरिस फेलो आणि १ मेजर डोनर करणे.

५) ३ वर्षात किमान एक सभासद प्रांतपाल करणे.

६) पुढील ३ वर्षाचे प्रेसिडेंट, सेक्रेटरी आणि ट्रेझरर निश्चित करणे.

७) डिस्ट्रिक्टमध्ये सर्वोत्कृष्ठ क्लब म्हणून मान्यता मिळवणे.

**मला वाटते लक्ष्य फार अवघड आजिबात नाही.**
**प्रे.डॉ.कुणाल आणि से. सुनील व सर्व**
**क्लब सभासद मित्रांना शुभेच्छा!**

## प्रस्तावना



रोटरी संबंधी सर्व माहिती इंग्लिशमध्ये आहे. ती मराठीत भाषांतरित करून मराठी भाषिकांना सहजपणे उपलब्ध करून देणे ही एक मोठी गरज लक्षात घेऊन रोटरियन मारुतराव जाधव यांनी बरेच वर्षांपूर्वी Rotary Manual of Procedure चे मराठीत भाषांतर केले होते. ते आजही बऱ्याच जणांच्या संग्रही आहे. Rotary Community Corps हा रोटरीला समाजाशी जोडणारा एक उपक्रम असल्याने त्याची माहिती मराठीत असणे ही काळाची गरज असल्याचे जाणून अगदी योग्य वेळी ही पुस्तिका उपलब्ध केल्याबद्दल त्यांचे आभार.

रोटरी समाज सेवा हे स्व-मदत गट रोटरी तर्फे राबवण्यात येणाऱ्या 'गोदान', 'आनंदी शाळा' अथवा 'पाणी नियोजन' अशा प्रकल्पांना पूरक ठरण्यासाठी जागोजागी स्थापन होणे गरजेचे आहे. रोटरियन मारुतराव रोटरीच्या सर्व विभागात पारंगत असल्याने त्यांच्या अनुभवाचा लाभ आम्हाला सतत होत असतो.

**त्यांना मनापासून शुभेच्छा.**

**रो. रवी धोत्रे**
**(प्रांतपाल २०१९-२०)**

# Flag Hosting









# Rakshabandhan

The Rotary Club of Ahmednagar Central organized a heartwarming Rakshabandhan program at the Remand Home for 92 children. During the event, the club generously donated a cupboard, rack, stationery, and food to the children, aiming to provide them with essential resources and joy on this special day. We extend our special thanks to Rtn. Nivrutti Zine and Rtn. Manoj Changediya for their significant contributions, which made this event even more impactful.










# Rheha Birthday Celebration

As part of the Annapurna Project, the Rotary Club of Ahmednagar Central celebrated a "Happy Birthday" event at Bal Sangopan Muk Badhir School in Ahmednagar. The club contributed food and stationery to the school, bringing joy to the children and supporting their educational needs. This initiative reflects our commitment to nourishing both the body and mind, ensuring that these special children feel cared for and valued.






# Monsoon Trip

Go Goa.......! Family mansoon trip 23/24/25 august

At hotel Neelam's the grand
























# Club Achievements

शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत ७५ किलो वजन गटात कुमार विजयसिंह विठ्ठलराव लांडगे हा विजयी झाला. त्याची महाराष्ट्र राज्य शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल आज रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य दादासाहेब  वांढेकर, पर्यवेक्षिका वैशाली दारकुंडे मॅडम, क्रीडाशिक्षक प्रा.  सुधाकर सुंबे, प्रा. संदेश भागवत व रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षकांनी विजयसिंह यांचा सत्कार केला.



**२९ ऑगस्ट - राष्ट्रीय. क्रीडा दिन**

काल क्रीडा भारती, अहिल्यानगर च्या वतीने आयोजित कार्यक्रम मध्ये कॉर्फ बॉल व मल्लखांब या खेळ मध्ये राष्ट्रीय सर्तावर नैपुण्य मिळविल्या बदल " साजरी राजेश परदेशी" हिला सन्मान पत्र देवून गौरविण्यात आले या वेळी वसंत लोढा, क्रीडा. भारती चे प्रांत सदस्य विजय पुरंदरे, रा स्व संघ नगर जिल्हा कार्यवाह हिरकांत रामदासी, क्रीडा भारती नगर शहर अधक्ष्य चपळगावकर, शहर मंत्री अमोल धोपावकर, छत्रपति पुरस्कार प्राप्त निर्मळ सर, कांबळे सर, तन्वर सर , गणेश वाळूंजकर सर.



# AUGUST BIRTHDAYS

| | |
|---|---|
| Rtn. ASHOK RAJARAM ZARKAR | 01 - Aug |
| Rtn. PRASANNA SHRIKANT KHAJGIWALE | 02 - Aug |
| Annette RASHMI KARNAWAT | 04 - Aug |
| Ann KANCHAN SAGAR SHARMA | 06 - Aug |
| Annette TATWAFARISHA Rajiv Mandal | 11 - Aug |
| Annette ASHWINI MANOJ TIWATANE | 14 - Aug |
| Ann BHAKTI DEVANG MEHTA | 15 - Aug |
| Ann RAKHI MANOJ CHANGEDIYA | 16 - Aug |
| Rtn. NILESH KRISHNADAS SHAH | 17 - Aug |
| Rtn. MAID SURESH MADHAVRAO | 18 - Aug |
| Annette GAURAV SANJAY GARUDKAR | 20 - Aug |
| Annette MANASI RAJIV GUJAR | 23 - Aug |
| Ann MRS. KALPANA AJAY GANDHI | 25 - Aug |
| Annette AMAR SIRIRSH RAYATE | 29 - Aug |
| Annette OMKAR SANJAY GARUDKAR | 29 - Aug |
| Annette OM DHIRAJKUMAR NAYYAR | 29 - Aug |
| Rtn. DR RAHUL N PANDIT | 31 - Aug |

# AUGUST ANNIVERSARY

DHIRAJKUMAR TILAKRAJ NAYYAR 28 - Aug

- BULLETIN DESIGN -

**OSME DESIGN PVT LTD**

8390909079

- BULLETIN EDITOR -

**Dr. Kirti Kolhe**

**Thank You !**